जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २ नोव्हेंबर, २०२२

जळगाव दि.२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत १ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत प्लॅस्टीक मुक्त भारत हा उपक्रम ११४ महाविद्यालयात राबविण्यात येऊन १९ हजार ९२० किलो प्लास्टीक कचरा गोळा करण्यात आला.

. भारत सरकारच्या युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालय आणि रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे यांच्या सुचनेनुसार या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ अधिक्षेत्रातील ११४ महाविद्यालयांनी या उपक्रमात सहभाग घेतला. १६६०० रासेयो स्वयंसेवकांनी या अभियानात १९ हजार ९२० किलो प्लास्टीक कचरा गोळा करुन त्या त्या भागातील महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यांच्या कडे देण्यात आला. हे प्लास्टीक विविध बसस्थानक, रेल्वेस्थानक, मंदिर परीसर, महाविद्यालय व विद्यापीठ परिसर, उद्यान, आदी सार्वजनिक स्थळांवरुन स्वयंसेवकांनी गोळा केला. हे अभियान राबवितांनाच स्वयंसेवकांनी गावाची स्वच्छता करुन नागरिकांमध्ये जागृती निर्माण केली. स्वच्छ भारत, सुंदर भारत, समृध्द भारत हा संदेश नागरिकांना दिला. काही ठिकाणी नागरिकांना या उपक्रमात सहभागी करुन घेत एकत्र काम करण्याचा व स्वच्छतेची धरु कास, देशाचा होईल विकास हा संदेश दिला. स्वच्छ भारत ठेवणे हीच महात्मा गांधीना खरी श्रध्दांजली ठरेल असाही संदेश गावकऱ्यांना स्वयंसेवकांनी दिला. या अभियानामुळे भविष्यात प्लॅस्टीकचा वापर कमी होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली अशी माहिती रासेयो विभागाचे संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी दिली.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगीत विभागातर्फे खान्देशस्तरीय सुगम गायन स्पर्धेचे आयोजन १४ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे प्रशाळेत करण्यात आले आहे.

या स्पर्धेत मराठी व हिंदी भावगीते, भक्तिगीते, सिनेगीत, अभंग व गझल या प्रकारातील गाणी स्पर्धकांना सादर करता येतील. स्पर्धेसाठी वयोगट १८ ते ३५ असा आहे. स्पर्धकांना स्पर्धेच्या ठिकाणी सकाळी ९ वाजेपासून नावनोंदणी करता येईल. या स्पर्धेत प्रथम येणाऱ्यास ५ हजार रुपये व स्मृतीचिन्ह, व्दितीय क्रमांकास ४ हजार रुपये व स्मृतीचिन्ह, तृतीय क्रमांकास ३ हजार रुपये व स्मृतीचिन्ह तसेच उत्तेजनार्थ एक हजार रुपयांची तीन पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. या स्पर्धेसाठी संगीत विभागातील प्रा.अलका चव्हाण, प्रा.तेजस मराठे व प्रा. प्रिया महाले यांच्याशी (०२५७) २२५७४५८ या दूरध्वनीक्रमांकावर संपर्क साधता येईल अशी माहिती कला व मानव्य विज्ञान प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ.अनिल चिकाटे यांनी दिली.

---

**बातमी क्र.३**

जळगाव दि.२ (प्रतिनिधी) चिखलदरा येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसाठी आयोजित साहसी शिबीरासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा संघ रवाना झाला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातील रासेयो कक्षाव्दारा हे साहसी शिबीर २ ते ६ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. या शिबीरासाठी विद्यापीठाच्या संघात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक गौरव पाटील (मु.जे.महाविद्यालय, जळगाव), माधव पाटील (समाजकार्य विभाग, कबचौउमवि), मेहुल नांद्रे (उत्तमराव पाटील महाविद्यालय, दहिवेल), कुणाल मराठे (आरएफएन वरिष्ठ महाविद्यालय, अक्कलकुवा), लक्ष्मी वायकोळे (डॉ.अ.जी.डी.बेंडाळे महाविद्यालय, जळगाव), वृदांवना पाटील (पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे), रोशनी सोनवणे (पीसीजीव्हीपीएम महाविद्यालय, शहादा) यांचा समावेश असून डॉ.प्रदिप राठोड (सि.गो.पाटील महाविद्यालय, साक्री) हे संघ व्यवस्थापक आहेत. या

संघास कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.विजय पाटील, डॉ.जगदिश सोनवणे, शरद पाटील, कैलास औटी, शिवाजी पाटील आदी उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी